विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

वार्षिक परीक्षा – मार्च २०२५

इयत्ता : अकरावी        विषय : मराठी (ब्दितीय भाषा)        वेळ : ३ तास

दिनांक : ०५।०३।२०२५        गुण : ८०

---

सूचना : १. शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

1. उनाड 1
2. प्रसन्न 1
3. शत्रु 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

4. जंगल 1
5. बलिदान 1
6. विश्व 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा.

7. आर्शीवाद 1
8. विषारी 1
9. शक्य 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

10. म्हातारा 1

11. लोहार 1

12. मादी 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

13. शेंगा 1

14. सावली 1

15. चिंच 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

16. घरप्रवेश <u>झाला</u> <u>आणि</u> पहिल्याच मृग नक्षत्राला <u>आईने</u> घरा<u>भोवती</u> बागशाही उठवायला सुरुवात केली. 4

## विभाग 2- गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

17. अप्पासाहेबांचे पूर्ण नाव काय? 1

18. वडिलांनी शेवग्याचे रोप कुठे लावले ? 1

19. आपले सैनिक तटबंदीवर कोणते काम करतात ? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

20. अप्पासाहेब व कावेरी …………… 1

अ. घर बांधायची स्वप्ने रंगवू लागतात.

आ. मोरवाडीच्या जीवनाची स्वप्ने रंगवू लागतात.

इ. परत रंगभूमी गाजवण्याची स्वप्ने रंगवू लागतात.

21. लेखक झेल्याशी नरमाईने वागायचा कारण………… 1

अ. झेल्या लेखकाचा साथीदार झाला होता.

आ. झेल्या लेखकाच्या कामामध्ये मदत करत होता.

इ. झेल्याचा उनाडपणा, गुंडगिरी आणि धाडस श्रेष्ठ असल्याची खात्री लेखकाला पटली होती.

22. वडिलानी जिथे घर बांधायचे ठरवले त्या जागेमध्ये................... 1

अ. नाना जातीची असख्य झाडे होती..

आ. शेणाने सारवायची जमीन व प्रशस्त अंगण होते.

इ. शेवग्याचे झाड होते.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

23. " मी जाणार हाय राती. त्यो निजला म्हंजे सळई तापवून तेच्या डोळयात खुपसणार हाय ! " 5

किंवा

" घराशेजारी झाडे असली ,तर ती माणसापेक्षा शेजारधर्माला चांगली ."

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

24. राणी अस्वल व नेली कुत्रीला नदीवर फिरायला नेताना कोणता मजेशीर प्रसंग घडला ?

किंवा

कॅप्टन विक्रम बात्रा याच्या बेडर वृत्तीला मृत्यूनेही मुजरा केला असेल असे लेखिकेला का वाटते ? 5

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

25. जनाबाईने कोणाला चोर म्हटले आहे ? 1

26. मोगरा कोणाशी कानगूज करतो आहे? 1

27. गाव कशाची चादर घेऊन येतो ? 1

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

28. गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून ______ परीक्षा ॥ 1

29. मी_______ मोजत पुण्याईची खोली । 1

30. रस्त्यातल्या ट्रॅफीकने धडकतो _______गाव देतो नदीच्या वहाणा 1

( आस्तिक, गावाची, उर, देशाची.)

खालील कवितेतील ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

31. जाणावे ग्राम हेचि मंदिर । ग्रामातील जन सर्वेश्वर ॥ 5

सेवा हेचि पूजा समग्र । हाचि विचार निवेदावा ॥

किंवा

चिंच उभी तळयाकाठी

चाफा रुतला मनात...

वेडया पोफळी उगाच

तिला पाहती पाण्यात.

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

32. विठ्ठलाला आपलेसे करण्यासाठी संत जनाबाईनी कशा प्रकारे भक्ती केली आहे? 5

किंवा

'तो' आणि 'मी यांच्या तुलनेतून कवी संदीप खरे यांनी सकारात्मक वृत्तीने जीवन जगण्याचा विचार कसा व्यक्त केला आहे ?

## विभाग 4 - लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

33. डोके चढणे______________ 1

- गुंग होणे
- संताप येणे
- उपाय शोधणे
- खूप दुःख होणे

34. गिल्ला करणे__________________ 1

- विनाकारण भटकणे
- नमते घेणे
- आरडाओरड करणे
- संतापणे

35. निजधामाला जाणे________________ 1

- मृत्यू पावणे
- खूप एकटे वाटणे
- कलंक लावणे
- पक्का निश्चय करून बसणे

36. त्रेधातिरपीट उडणे ________ 1

- घाबरणे
- वाईट वाटणे
- विचारमग्न होणे
- गोंधळून जाणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

व्यसन हा एक मानसिक आजार होऊन बसलेला आहे ,दारू,सिगरेट,तंबाखु इत्यादी मादकअंमली पदार्थाच्या सेवनाने मानवी शरीरावरती मोठा परिणाम होत आहे.या मादक पदार्थाच्या सेवनाने जीवनातील दुःख,ताण,व नैराश्य दूर होतं, अशी एक खोटी सबब काही जणांकडून दिली जाते .मात्र त्यात काही तथ्य नाही ,एकदा नशा उतरला की माणूस पुन्हा त्याच फेऱ्यात अडकतो. आजचा युवावर्ग मित्रांच्या दबावामुळे, आग्रहाखातर ,चुकीच्या कल्पनेमुळे ,एक स्टाईल, थ्रिल, मौजमजा , जोश,जगावेगळे काहीतरी करण्याच्या विचाराने व्यसनाकडे वळत आहे.या व्यसनाशिवाय तो राहू शकत नाही आणि ते मिळाले नाही तर कोणत्याही थरापर्यंत जाण्यासाठी तयार आहे. मात्र आपल्या या वागण्याने आपण नातेवाईकापासून तर दूर जात आहोत, सामाजिक जीवनात बदनाम होत आहोत,आयुष्याची एक एक पायरी खाली उतरत आहोत ,याचा त्यांना विसर पडत आहे.त्यामुळे प्रत्येकाने व्यसनमुक्त राहून चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. युवकांनी आपल्या अंगी असलेल्या छंदाचा व्यासंग बाळगावा. जीवनातील नैराश्य घालवण्यासाठी विविध खेळ खेळा, वाचन करा ,व्यायाम करा, चांगले मित्र जोडा व सामाजिक जीवनात कार्यरत रहा.तुमचं जीवन सुंदर बनेल.

गुलदस्ता : मृणालीनी कुलकर्णी

प्रश्न :

37. व्यसनाबद्दल कोणती खोटी सबब दिली आहे ? 1

38. आजचा युवक व्यसनाकडे का वळत आहे ? 2

39. जीवनातील नैराश्य घालवण्यासाठी युवकांनी काय करायला हवे? 2

40. ' आरव उच्च माध्यमिक विद्यालय ' पणजी ''येथे संपन्न झालेल्या 'राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे उद्घाटन' कार्यक्रमाचा वृत्तांत 10 ते 12 ओळीत. लिहा 5

41. ' वाढती महागाई आणि सामान्य माणूस ' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते12 ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

माझा आवडता खेळाडू

किंवा

प्राणी बोलू लागले तर.....

किंवा

वाढते पर्यटन व गोव्यासमोरील आव्हाने

किंवा

खड्डे पडलेल्या रस्त्याचे आत्मकथन

किंवा

मी पाहिलेले एक रम्य स्थळ